# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १०/०२/२०२५ (सोमवार) दुपार**

---

## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द कारवाई
## स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कारवाई

दिनांक ०९/०२/२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीणचे पथक अवैध धंदयावर कारवाई कामी पेट्रलिंग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पोलीस स्टेशन मौदा हद्दीत अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा मोहगाव ,कुही रोड येथे नाकाबंदी केली असता **एक १० चक्का टिप्पर अशोक लेलॅड क्र.एम.एच ४० सी.टी.५३८१** हे थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्पर चालक आरोपी नामे १) राहुल रंगराव दांडेकर,वय ३२ वर्ष रा. वार्ड. नं.१४ कुही याला परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले.तसेच रेतीची वाहतुक टिप्पर मालक जयराम तुळशिराम भिवगडे,रा. सिल्ली ता कुही यांच्या सांगण्यावरून करीत असल्याबाबत सांगितले. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन **एक १० चक्का अशोक लेलॅड क्र.एम.एच ४० सी.टी. ५३८१ किंमत २०,००,००० रू.तसेच सदर वाहनात ०५ ब्रास रेती किं.२५००० रू.असा एकुण २०,२५,०००रूपयाचा मुददेमाल जप्त केला आहे.**

टिप्पर चालक आरोपी नामे १) राहुल रंगराव दांडेकर,वय ३२ वर्ष रा. वार्ड. नं.१४ कुही **आणि** ट्रक मालक जयराम तुळशिराम भिवगडे,वय वर्ष,रा. सिल्ली ता कुही आणि टिप्पर मालक जयराम तुळशिराम भिवगडे,रा. सिल्ली ता कुही **यांच्या** विरूध्द **कलम ३०३(२),४९ भा. न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सह कलम ४,२१ खाण खनिज अधिनियम,सह कलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी क्र १ ला अटक करण्यात आली आहे.**

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर